निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
मंगळवार
२४ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३५९ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# पायाभूत सुविधा, गुंतवणूक आणि जनकल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर राज्य शासनाचा भर- राज्यपाल आचार्य देवव्रत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** राज्याची अर्थव्यवस्था २०४७ पर्यंत ५ट्रिलीयन डॉलर्सपर्यंत वाढविण्यासाठी राज्य शासन कृतिशिल आहे. पायाभूत सुविधा, गुंतवणूक, आणि जनकल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर राज्य शासनाचा भर आहे. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडल्या जाणाऱ्या विधेयकांवर विधीमंडळ सदस्यांनी विधायक चर्चा करावी, असे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज केले.राज्य विधानमंडळाच्या २०२६ या वर्षातील पहिल्या अधिवेशनाची सुरूवात राज्यपाल अभिभाषणाद्वारे झाली, त्यावेळी राज्यपाल देवव्रत बोलत होते. विधानमंडळात अभिभाषणाच्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्रीमंडळाचे सर्व सदस्य तसेच दोन्ही सभागृहातील सदस्य उपस्थित होते.

**मुलभूत सुविधा, सीमावाद, उद्योग, शेती, शिक्षण व सांस्कृतिक वारसा संवर्धनापर्यंत शासनाचा व्यापक दृष्टीकोन**

सीमावाद सोडविण्यासाठी ठोस पावले

राज्यपाल आचार्य देवव्रत अभिभाषणात म्हणाले की, राज्याच्या सर्वांगीण, समावेशक आणि शाश्वत विकासासाठी शासन कटिबद्ध असून विकसित महाराष्ट्राच्या दिशेने राज्याची दमदार वाटचाल सुरू आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद सोडविण्यासाठी शासन वचनबद्ध असून सर्वोच्च न्यायालयात राज्याची भक्कम बाजू मांडण्यासाठी नामांकित वकिलांची नियुक्ती केली आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांसाठी शिक्षण, आरोग्य व विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवल्या जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.



गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर

महाराष्ट्राचा देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात १३.५ टक्क्यांहून अधिक वाटा असून २०२४-२५ या वर्षात राज्याला १,६४,८७५ कोटींची थेट परकीय गुंतवणूक प्राप्त झाली. ही देशातील एकूण गुंतवणुकीच्या ३९ टक्के आहे. २०२५-२६ च्या पहिल्या सहामाहीत ९१,३३७ कोटींची गुंतवणूक राज्यात आली आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या २०२६ मधील दावोस येथील परिषदेत सुमारे ३० लाख कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले असून त्यातून ४० लाख रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७'साठी व्हिजन मॅनेजमेंट युनिट स्थापन करण्यात आले आहे.

नवे उद्योग धोरण आणि स्टार्टअपला चालना

'महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५'अंतर्गत १७.५० लाख कोटी गुंतवणूक व ५० लाख रोजगाराचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. बांबू, रत्न-आभूषण, एव्हीजीसी-एक्सआर तसेच जागतिक सामर्थ्य केंद्र धोरण जाहीर करण्यात आले. गडचिरोलीला स्टील हब तर पूर्व विदर्भाला स्टील कॉरिडॉर म्हणून विकसित करण्याची योजना आहे. 'महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता व नवोन्मेष धोरण २०२५'द्वारे पुढील पाच वर्षांत १.२५ लाख उद्योजक व ५० हजार स्टार्टअप्सना सहाय्य देण्याचे उद्दिष्ट आहे.

निर्यात सज्जता निर्देशांकात राज्य अव्वल

नीती आयोगाने जानेवारी २०२६ मध्ये प्रकाशित केलेल्या 'निर्यात सज्जता निर्देशांक २०२४ मध्ये महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्याचबरोबर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, व महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडील निवडक पायाभूत सुविधांचे प्रकल्प, पायाभूत सुविधा गुंतवणूक न्यासाकडे हस्तांतरित करण्यास आणि सार्वजनिक व खाजगी गुंतवणूकदारांकडून निधी उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे कर्जाचा भार कमी होऊन नवीन पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांमधील गुंतवणुकीत वाढ होण्यास मदत होणार आहे.

पायाभूत सुविधा व सागरी विकास

राज्याच्या आर्थिक व औद्यागिक विकासाला गती देण्यासाठी ४,४७८ कोटींच्या १४७ प्रमुख रस्ते प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. मुंबईतील 'इंडिया मेरीटाइम वीक २०२५'दरम्यान सुमारे ५६,००० कोटींचे करार झाले. जहाजबांधणी, दुरुस्ती व पुनर्वापर धोरण जाहीर करण्यात आले आहे.

कृषी क्षेत्र, शेतकरी सक्षमीकरणावर भर

'महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण' लागू करून शेती अधिक उत्पादक करण्यावर भर देण्यात आला आहे. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देत ३.२२ लाख हेक्टर क्षेत्रावर ७,००० शेतकरी गट कार्यरत आहेत. कापूस व सोयाबीन खरेदी, पीकविमा व आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना १५,५७६ कोटींची थेट मदत देण्यात आली.'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना'अंतर्गत ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीज देण्यात येत असून ४४ लाख शेतकऱ्यांना २५,०८७ कोटींचा दिलासा देण्यात आला आहे. सौर पंप बसविण्यात राज्याने विक्रम प्रस्थापित केला असून त्याची दखल गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड्सने घेतली. तसेच राज्याच्या जल संधारण आणि व्यवस्थापन क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये सर्वोत्तम राज्याचे प्रथम पारितोषिक महाराष्ट्राला प्राप्त झाले आहे.

राज्यात जून ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीतील पूर व अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना १५,५७६ कोटी रूपयांचे आर्थिक सहाय्य थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले.

महिला व आदिवासी सक्षमीकरणासाठी कटिबद्ध

'उमेद' अभियानांतर्गत ६.६० लाख महिला बचतगटांना बँक कर्ज उपलब्ध झाले असून २६ लाखांहून अधिक महिला 'लखपती दीदी' बनल्या आहेत. आदिवासी महिलांसाठी 'राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजना' जाहीर करण्यात आली.

शिक्षण, कौशल्य व आरोग्य

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठने कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्ससारख्या क्षेत्रात विस्तार केला आहे. डिप्लोमा अभ्यासक्रमांची १५४ विषयांची शैक्षणिक सामग्री मराठीत उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी विशेष धोरण लागू करण्यात आले आहे.कर्करोग उपचारासाठी व्यापक कॅन्सर केअर धोरण राबविण्यात येत असून दुर्मिळ अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया मोफत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सांस्कृतिक वारसा आणि पर्यटन

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत राज्यातील ११ किल्ल्यांचा समावेश झाला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त चित्रपट निर्मितीचा निर्णय घेण्यात आला आहे. विविध तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ३,६६१ कोटींची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

क्रीडा क्षेत्रातील गौरव

बुद्धिबळ विश्वविजेती दिव्या देशमुख तसेच भारतीय महिला क्रिकेटपटू स्मृती मानधना, जेमिमा रॉड्रीग्ज, राधा यादव आणि मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर पहिल्या टी-२० अंध महिला विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद जिंकल्याबद्दल हिंगोलीची खेळाडू गंगा कदम यांचा सत्कार करण्यात आला आहे, असे राज्यपाल आचार्य देवव्रत आपल्या अभिभाषणात म्हणाले.


# नादरपूर शिवारात बिबट्याचा थरार! पाळीव कुत्र्यावर हल्ला

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील नादरपूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे प्रचंड वातावरण निर्माण झाले आहे. नादरपूर येथील गट क्रमांक १६९ मध्ये बिबट्याने एका पाळीव कुत्र्यावर हल्ला करून त्याला ठार केल्याची धक्कादायक घटना २१ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ वाजेच्या सुमारास घडली. ही सर्व घटना शेतातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, यामुळे परिसरात दहशतीचे सावट पसरले आहे.

**थरारक घटना सीसीटीव्हीत कैद**

नादरपूर येथील शेतकरी पांडुरंग कोंडू निकम आणि दादाराव दत्तू निकम यांच्या शेतात जनावरांचा गोठा आहे. २१ फेब्रुवारीला पहाटेच्या शांततेचा फायदा घेत बिबट्याने या गोठ्याच्या परिसरात प्रवेश केला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये बिबट्या दबा धरून येताना आणि पाळीव कुत्र्यावर झडप घालून त्याला ठार करताना स्पष्टपणे दिसत आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही अशा घटना अनेकवेळा घडल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले आहे.




वनविभागाकडून पाहणी व सूचना

घटनेची माहिती मिळताच वनरक्षक अनिल इंगळे व त्यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केल्यानंतर वनविभागाने या परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे स्पष्ट केले आहे.

नागरिकांना सतर्कतेचा इशारा

बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे वनरक्षक गणेश इंगळे यांनी ग्रामस्थांना सुरक्षिततेच्या दृष्टीने खालील आवाहन केले आहे.

**प्रकाश व्यवस्था:** रात्रीच्या वेळी गोठ्यात आणि घराच्या परिसरात पुरेसा प्रकाश ठेवावा.

**एकटे फिरणे टाळा:** रात्रीच्या वेळी किंवा पहाटे शेतात एकटे जाणे टाळावे, सोबत काठी किंवा बॅटरी ठेवावी.

**जनावरांची सुरक्षा:** लहान वासरं आणि पाळीव प्राणी सुरक्षित व बंदिस्त जागी बांधावेत.

**प्रशासनाला कळवा:** परिसरात कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा.

शेतकऱ्यांनी घाबरून न जाता सतर्क राहणे गरजेचे आहे. वनविभाग परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

**- वनरक्षक, नादरपूर परिसर**

या घटनेमुळे शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण असून, वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# डिजिटल प्रणालीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन होणार अधिक सक्षम; 'एआय फॉर ग्री २०२६' परिषदेत तज्ज्ञांचे प्रतिपादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केवळ व्यवहारापुरता मर्यादित नसून, ती एक व्यापक परिसंस्था आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना अधिक परिणामकारक आर्थिक नियोजन करणे आणि उत्पादकता वाढवणे शक्य झाले आहे, असे प्रतिपादन जागतिक बँकेच्या इन्व्हेस्टमेंट ऑफिसर आणि डिजिटल लीड सुश्री फंगफंग जीयांग यांनी केले.




मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन' (AI for agri 2026) च्या दुसऱ्या दिवशी 'डिजिटल कृषी वित्तीय मॉडेल्सचा विस्तार' (Scaling up Digital agri Finance Models) या विषयावर चर्चासत्र पार पडले.

**कृषी आणि वित्त यांचा समन्वय आवश्यक**

सुश्री फंगफंग जीयांग यांनी सादरीकरणादरम्यान स्पष्ट केले की, शेती आणि वित्त हे दोन स्वतंत्र विभाग नसून त्यांचा एकमेकांशी जवळचा संबंध आहे. आयएफसी (IFC) सध्या १०० पेक्षा जास्त देशांमध्ये कार्यरत असून आशियातील ५६ प्रकल्पांमध्ये त्यांचा सहभाग आहे. शेतकऱ्यांसमोरील हवामान बदल आणि औपचारिक कर्ज मिळवण्यातील अडचणी यांसारख्या आव्हानांवर मात करण्यासाठी शासन आणि खाजगी क्षेत्राने एकत्र येणे गरजेचे आहे.

स्मार्ट शेती परिसंस्थेसाठी आवश्यक घटक:

हवामान डेटा व उपग्रह प्रतिमा: पिकांच्या अचूक अंदाजासाठी तंत्रज्ञानाचा वापर.बिग डेटा प्लॅटफॉर्म: पीक उत्पादन आणि हवामानाचा अंदाज वर्तवणारी सरकारी यंत्रणा.एआय आधारित सेवा: पशुवैद्यकीय सल्ला आणि डिजिटल उत्पादन व्यवस्थापन.

उपग्रह तंत्रज्ञानामुळे कर्ज प्रक्रिया होणार सुलभ

सॅटसूर (SatSure) चे चीफ रेव्हेन्यू ऑफिसर ध्रुव राजन यांनी उपग्रह डेटाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. उपग्रह प्रतिमांमुळे पिकांचे अचूक नकाशांकन (Crop Mapping) आणि जोखीम मूल्यांकन करणे सोपे होते. यामुळे बँकांना कर्ज देताना होणारी कागदपत्रांची पडताळणी जलद होऊन कर्ज प्रक्रियेतील अडथळे कमी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गेट्स फाउंडेशनचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी सिद्धार्थ चतुर्वेदी यांनी तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत सरकारी योजना पोहोचवण्याच्या गरजेवर भर दिला. त्यांनी तामिळनाडूतील एका यशस्वी उपक्रमाचे उदाहरण दिले, जिथे ८०% महिलांचा सहभाग आहे. उत्पादन नियोजनापासून ते बाजारपेठ मिळवून देण्यापर्यंत संपूर्ण साखळी डिजिटल पद्धतीने जोडली जाणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**मानवकेंद्रित 'एआय' डिझाइनवर भर**

द्वारा होल्डिंग्जचे सह-संस्थापक समीर शाह यांनी पशुधन डिजिटायझेशनची उदाहरणे दिली. त्यांच्या मते, कृषी क्षेत्रात एआय (AI) चा विस्तार करताना खालील दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत:नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी लोकांच्या मानसिकतेत बदल आणि नियामक सुधारणा करणे.कोणतेही तंत्रज्ञान राबवताना ते 'मानव-केंद्रित' असणे अनिवार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.महाराष्ट्र सरकारच्या 'कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' अंतर्गत आयोजित या परिषदेने कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर करून क्रांती घडवण्याचा मार्ग मोकळा केला आहे.

# पारनेर येथील सावित्रीबाई फुले विद्यालयात मानसिक आरोग्य व किशोरवयीन बदल कार्यशाळा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी /** विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य सुदृढ असावे आणि किशोरवयात होणाऱ्या बदलांकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहता यावे, या उद्देशाने सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय, पारनेर येथे सामान्य मानसिक आरोग्य व किशोरवयात होणारे बदल या विषयावर एक विशेष मार्गदर्शनपर कार्यशाळा सोमवारी (२३ फेब्रुवारी) पार पडली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंतीही मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक अभिमन्यू गाढवे सर होते.प्रमुख पाहुणे म्हणून संवेदना प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक (मानसिक स्वास्थ्य) श्री. पी. बी. नखाते आणि उजास प्रकल्पाचे तालुका समन्वयक (किशोरवयीन बदल) श्री. संदीप वखरे उपस्थित होते.




कार्यक्रमाचा प्रारंभ राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आणि अभिवादन करून करण्यात आला. मुख्याध्यापकांच्या हस्ते पाहुण्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.मानसिक स्वास्थ्य हीच काळाची गरज: नखाते,कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात नखाते सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की,शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य महत्त्वाचे आहे.ताणतणाव, नैराश्य, आघात आणि दबावामुळे होणारे मानसिक आजार ओळखणे गरजेचे आहे.अंधश्रद्धेला बळी न पडता विज्ञानाचा आधार घ्यावा.

मोबाईलचा अतिवापर टाळून मैदानी खेळांना प्राधान्य द्यावे.यावेळी त्यांनी शासनाच्या मानसिक आरोग्य हेल्पलाईन क्रमांकांची माहिती देऊन संकटाच्या वेळी कोठे संपर्क साधावा, हेही समजावून सांगितले.

किशोरवयीन बदल आणि जागरूकता: वखरेदुसऱ्या सत्रात श्री. संदीप वखरे यांनी किशोरवयीन मुला-मुलींमधील बदलांवर भाष्य केले. त्यांनी खालील मुद्द्यांवर भर दिला.

शारीरिक व भावनिक बदल: या वयात होणारे बदल नैसर्गिक असून त्याबद्दल भीती न बाळगता शास्त्रीय माहिती घ्यावी.

आहार आणि नियंत्रण: योग्य वाढीसाठी सकस आहार घ्यावा आणि आपल्या भावनांवर नियंत्रण मिळवण्यास शिकावे.

आकर्षण: या वयातील आकर्षणाच्या भावनांना वेळीच ओळखून स्वतःच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करावे.

मुख्याध्यापक अभिमन्यू गाढवे यांनी आपल्या भाषणात गाडगे महाराजांच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, स्वच्छता, शिक्षण आणि दुःखी लोकांची सेवा हाच खरा धर्म मानणाऱ्या गाडगेबाबांनी महाराष्ट्राला माणुसकीची शिकवण दिली. त्यांच्या विचारांचे पालन करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक राजेश भापकर, विश्वनाथ पोटफोडे, दत्ता शेरे, बंडू मामा आणि इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# आष्टीतील अवैध धंदयाना देशी दारूचे बॉक्स पुरवणाऱ्या दुकानावर राज्य उत्पादन शुल्क आष्टी पोलीस कारवाई करणार का ?

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी-गणेश सपकाळ /** परतुर तालुक्यातील आष्टी मोठे बाजार पेठ असुन त्यामुळे आजुबाजूच्या खेडया पाड्यातून नागरीक मोठ्या प्रमाणात खरेदी करीता येत असतात.याचा फायदा उचलत आष्टी मध्ये अनेक अवैध देशी दारूच्या दुकान बिनभोबाट पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादाने चालू असुन यासर्वे अवैध देशी दारूच्या धंदयाना बॉक्स पुरवण्याचे काम आष्टीतील देशी दारूचे दुकान करीत असताना आष्टी पोलीस व राज्य उत्पादन शुल्क यांनी कारवाई करण्या ऐवजी 'आम्ही दोघे भाऊ मिळून मिसळून खाऊ' या मराठीतल्या मनी प्रमाणे आष्टी पोलीस व राज्य उत्पादन शुल्क यांचा कारभार सुरू तर नाही असा प्रश्न सामान्य जनता उपस्तीत करत असून राज्य उत्पादन शुल्क असो किंवा आष्टी पोलीस यांनी मनावर घेतल्यास अवैध धंदे बंद करायला वेळ लागणार नाही.पण आष्टी मध्ये सर्रास अवैध देशी विक्रेत्याना बॉक्स पुरवणाऱ्या जैस्वाल यांच्या आष्टीतील देशीच्या दुकानावर कारवाई करण्याचे धाडस कोणी करायला पुढे येत नाही.हे मोठे गोडबंगाल आहे.खुले आम राजरोस पणे दुचाकी वरुण बॉक्स जात असताना प्रशासन यावर कारवाई करण्या ऐवजी शांत बसुन तमाशा पाहताना दिसत आहे.प्रशासनाच्या अर्थपूर्ण धोरणामुळे अनेक संसार उध्वस्त होत असुन या प्रकाराला आळा घालायचा असेल अवैध धंदयावाल्या कडील देशी दारूच्या बॅच नंबर तपासुन कारवाई होणे गरजेचे आहे.परंतू या अवैध धंदयावर कारवाई करणार कोण हा मोठा प्रश्न आष्टीतील सुज्ञान नागरिकांना पडला आहे.

जालना जिल्ह्यात एम आर पी पेक्षा दहा रुपये शिल्लक दराने देशी दारूची विक्री होत असताना यावर राज्य उत्पादन अधिकारी कारवाई करण्या ऐवजी सरळ हातानी दुकानदाराला तळीरामाची लूट करायला मोकळीक देल्याची दिसते.देशी दारूच्या दुकानदारावर राज्य उत्पादन शुल्क अधीकाऱ्याची ऐवढी मेहरबान कसे याची चौकशी करण्याची गरज असुन देशी दारू दुकानदार आपला मनमानी कारभार कोणाच्या आर्शीवादाने चालवीत आहेत.

जालना जिल्हात परतुर,मंठा,घनसांवगी,रांजनी पाडगाव,अंबड,विरेगाव,रामनगर,जाफ्राबाद भोकरदन या तालुक्यात फोफावत चाललेल्या अवैध देशी दारूच्या विक्रेत्याना बॉक्स पुरवणार्या दुकानावर कारवाई करण्याची गरज आहे.परंतु प्रशासन थातुर मातुर कारवाई करत मुळ 'आका' ला वाचवत असल्याने अवैध देशी दारू विक्रीचे जाळे दिवसान दिवस वाढत चालले आहे.जालना जिल्हात पन्नास टक्के खेडया पाड्यात देशी दारूची विक्री होत असल्याची चर्चा असुन याला प्रशासनाचे अर्थपूर्ण घोरण जबाबदार आहे.









# मायबोलीचा जागर आणि काळाची पावले!

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी... या उक्तीप्रमाणे मराठी भाषेचा वारसा लाभणे हे कोणत्याही मराठी माणसासाठी अभिमानास्पद आहे. दरवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस आपण 'कुसुमाग्रज' म्हणजेच वि.वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करतो. हा केवळ एक दिवस नसून तो मराठी भाषेचा जाज्वल्य इतिहास आणि उज्ज्वल भविष्याचा सेतू आहे.

विष्णू वामन शिरवाडकर यांनी आपल्या लेखणीतून मराठी साहित्याला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. त्यांच्या अथांग साहित्यसेवेमुळेच त्यांचा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून ओळखला जातो. त्यांनी केवळ कविता किंवा नाटके लिहिली नाहीत, तर मराठी भाषेची अस्मिता जिवंत ठेवली. आज जगभरातील मराठी भाषिक हा दिवस उत्साहाने साजरा करतात, कारण मराठीचा डंका आज सातासमुद्रापार वाजत आहे.

मराठी भाषा ही गंगेसारखी निर्मळ आणि वटवृक्षासारखी अफाट आहे. महाराष्ट्राच्या भूमीत दर ४० किलोमीटरवर भाषेचा लहेजा बदलतो, पण त्यातील गोडवा मात्र कायम राहतो.सुलभता: दक्षिण भारतीय भाषांच्या तुलनेत मराठी शिकायला आणि बोलायला सोपी असल्याने परप्रांतीय लोकही ती सहज आत्मसात करतात.संस्कारांची जननी: छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर, तुकाराम आणि अनेक समाजसुधारकांच्या संस्कारातून ही भाषा घडली आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी भाषेचे आक्रमण वाढत आहे. लेखक रमेश लांजेवार यांनी मांडल्याप्रमाणे, 'आई-बाबा' ऐवजी 'मम्मी-पप्पा' आणि 'मावशी-काका' ऐवजी 'अँटी-अंकल' हे शब्द घराघरात शिरत आहेत.सावधानता: इतर भाषा शिकाव्यात, त्या अवगत कराव्यात, पण आपल्या मातृभाषेच्या 'अमृतवाणी'ला तडा जाणार नाही याची काळजी तरुण पिढीने घेणे आवश्यक आहे. जर आपण आपले मूळ शब्द विसरलो, तर भाषेचा आत्मा नष्ट होण्याची भीती आहे.

मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती आपली संस्कृती आणि वारसा आहे. तिचे जतन करण्यासाठी खालील पावले उचलणे गरजेचे आहे:

वाचन संस्कृती: नवीन पिढीने किमान एक मराठी वृत्तपत्र किंवा पुस्तक दररोज वाचले पाहिजे.दैनंदिन वापर: कार्यालयीन आणि सामाजिक व्यवहारात मराठीचा आग्रह धरला पाहिजे.डिजिटल माध्यमात वापर: सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानाच्या युगात मराठी भाषेचा वापर वाढवणे ही तरुणांची जबाबदारी आहे.

यावर्षीचा मराठी भाषा दिन हा केवळ भाषणांपुरता मर्यादित न राहता, त्याला 'निसर्ग संवर्धनाची' जोड देणे ही लेखकाची संकल्पना कौतुकास्पद आहे. वाढते प्रदूषण आणि हवामान बदल यामुळे पृथ्वीचे संतुलन बिघडत आहे. जर जगभरातील लाखो मराठी भाषिकांनी या दिवशी 'वृक्षारोपण' केले, तर मराठी भाषेचा सुगंध निसर्गाच्या हिरवाईतून दरवळेल. हा संदेश संपूर्ण जगासाठी एक आदर्श ठरेल.

मराठी भाषा ही महाराष्ट्राचा 'मोराचा तुरा' आहे. ती जितकी जुनी आहे, तितकीच ती आधुनिकही आहे. मातृभाषा ही 'आई'ची भूमिका बजावते, तर राष्ट्रभाषा 'वडील' आहे. आपल्या आईचा सन्मान राखणे हे मुलांचे कर्तव्य असते.

म्हणूनच, या मराठी भाषा दिनानिमित्त आपण शपथ घेऊया की, जगात कुठेही गेलो तरी आपली मायबोली विसरणार नाही आणि ती सुवर्णाक्षरांनी जगाच्या नकाशावर कोरण्यासाठी कटीबद्ध राहू.

जागतिक मराठी भाषा गौरव दिनाच्या सर्व मराठी मनांना हार्दिक शुभेच्छा!

# प्रा. डॉ. स्मिता अवचार : समाजशास्त्राच्या सेवाव्रतापासून ते जीवनगौरवापर्यंत

महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्रीय परंपरेत काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांचे कार्य केवळ विद्यापीठीय चौकटीत मर्यादित राहत नाही, तर ते समाजाच्या वैचारिक जडणघडणीचा अविभाज्य भाग बनते. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव म्हणजे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम आहेत. समाजशास्त्र या विषयाला मानवी संवेदनशीलतेची, सामाजिक बांधिलकीची आणि शास्त्रीय काटेकोरतेची जोड देत त्यांनी जे दीर्घकालीन कार्य केले आहे, त्याची दखल घेत महाराष्ट्रातील मराठी समाजशास्त्र परिषद यांच्यातर्फे देण्यात येणारा २०२५-२६ चा जीवन गौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. दि. १७-१८ फेब्रुवारी रोजी नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, कला व वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर, जि. नाशिक येथे आयोजित मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३५व्या राष्ट्रीय अधिवेशनात हा सन्मान मराठी समाजशास्त्र परिषेदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक आणि भारतीय समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दीप्ती रंजन साहू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आणि महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्र क्षेत्रात एक गौरवशाली क्षण नोंदवला गेला आहे.

हा पुरस्कार केवळ एका प्राध्यापिकेच्या प्रदीर्घ सेवेला दिलेली औपचारिक मान्यता नाही, तर समाजशास्त्र या विषयाच्या सामाजिक उपयोगितेला दिलेली दाद आहे. समाजातील दुर्बल, वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांना संशोधनाच्या केंद्रस्थानी ठेवून समाजशास्त्राला 'माणसांशी जोडलेला विषय' बनवण्याचे कार्य प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांनी आयुष्यभर केले. त्यामुळेच जीवन गौरव पुरस्कार हा त्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा शेवट नसून, त्यांच्या सेवाव्रताची सार्वजनिक कबुली आहे.

प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचा शैक्षणिक प्रवास हा सातत्य, चिकाटी आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यांचा सुंदर संगम आहे. एम.ए., एम.फिल., डी.एच.ई. आणि पीएच.डी. या शैक्षणिक टप्प्यांतून त्यांनी समाजशास्त्राच्या मूलभूत संकल्पना, सिद्धांत आणि संशोधन पद्धती यांचे सखोल ज्ञान प्राप्त केले. मात्र, त्यांच्या शिक्षणाचा उद्देश केवळ पदव्या मिळवणे हा कधीच नव्हता. समाज समजून घेणे, समाजातील प्रश्न ओळखणे आणि त्या प्रश्नांवर शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करणे, हा त्यांच्या अभ्यासाचा खरा गाभा राहिला.

समाजशास्त्र हा विषय त्यांनी केवळ सैद्धांतिक पातळीवर न ठेवता तो समाजाशी संवाद साधणारा बनवला. सामाजिक बदल, विकास प्रक्रिया, कुटुंबसंस्था, लिंगभाव, स्त्री-पुरुष संबंध, वृद्धत्व, शहरीकरण आणि ग्रामीण वास्तव या सर्व विषयांकडे त्यांनी संवेदनशीलतेने आणि वस्तुनिष्ठतेने पाहिले. त्यामुळेच त्यांचा शैक्षणिक प्रवास हा 'पुस्तकांतील समाज' आणि 'प्रत्यक्षातील समाज' यांच्यातील दरी भरून काढणारा ठरतो.

त्यांचे दीर्घकालीन अध्यापन कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील समाजशास्त्र विभागाशी निगडित आहे. विद्यापीठीय प्राध्यापिका आणि विभागप्रमुख म्हणून त्यांनी पदव्युत्तर स्तरावर समाजशास्त्र विषयाचे अध्यापन केले.

वर्गखोलीतील त्यांचे अध्यापन हे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरते मर्यादित नव्हते, तर विद्यार्थ्यांमध्ये समाजाकडे पाहण्याची चिकित्सक दृष्टी निर्माण करणारे होते. सामाजिक घटनांचे विश्लेषण, प्रत्यक्ष उदाहरणे, क्षेत्रकार्याचे अनुभव आणि संशोधनातील शिस्त या सर्वांचा समन्वय त्यांच्या अध्यापनात दिसून येतो.

समाजशास्त्र शिकवताना त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारायला, निरीक्षण करायला आणि निष्कर्ष काढायला शिकवले. 'समाजशास्त्र म्हणजे केवळ उत्तरांचा संच नव्हे, तर प्रश्न विचारण्याची शिस्त आहे,' ही भूमिका त्यांच्या अध्यापनातून सातत्याने व्यक्त होत राहिली. त्यामुळेच त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये केवळ परीक्षाभिमुख तयारी नव्हे, तर संशोधनाभिमुख विचारसरणी विकसित झाली.

अध्यापनाबरोबरच संशोधन हे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांच्या शैक्षणिक जीवनाचे मुख्य केंद्र राहिले. समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, विकासाचे समाजशास्त्र, लिंगभाव आणि समाज तसेच वृद्धत्वाचे समाजशास्त्र ही त्यांची विशेष अभ्यासक्षेत्रे आहेत. या क्षेत्रांतील त्यांचे संशोधन केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष सामाजिक वास्तवाशी घट्ट जोडलेले आहे. कौटुंबिक बदल, शहरीकरण, औद्योगिकीकरण, महिलांचे सक्षमीकरण, वृद्धांचे प्रश्न, कौटुंबिक हिंसाचार आणि दारूबंदी चळवळ यांसारख्या विषयांवर त्यांनी केलेले संशोधन समाजातील बदलत्या प्रक्रिया स्पष्ट करणारे ठरत आहे.

विकासाचे समाजशास्त्र या क्षेत्रात त्यांनी विकास प्रक्रियेचा मानवी पैलू अधोरेखित केला. विकास म्हणजे केवळ आर्थिक वाढ नसून सामाजिक न्याय, समान संधी आणि मानवी सन्मान यांचा समतोल असावा, ही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. ग्रामीण आणि शहरी समाजातील विकासातील तफावत, स्वयं-सहायता गटांचे सामाजिक परिणाम आणि महिलांचे सक्षमीकरण यावरील त्यांच्या संशोधनातून विकासाच्या संकल्पनेला व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे.

लिंगभाव आणि समाज या विषयावर त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. स्त्री-पुरुष समानता ही केवळ कायदेशीर तरतुदींमध्ये मर्यादित न राहता ती सामाजिक व्यवहारात कशी प्रकट होते, याचा त्यांनी सखोल अभ्यास केला. महिलांवरील हिंसाचार, कौटुंबिक नातेसंबंध, कामगार क्षेत्रातील महिलांची स्थिती आणि दारूबंदी चळवळीत महिलांची भूमिका अशा विषयांवरील त्यांच्या संशोधनातून लिंगभाव असमानतेची संरचनात्मक कारणे स्पष्ट झाली आहेत. त्यांच्या लेखनात स्त्री ही केवळ अभ्यासविषय न राहता सामाजिक परिवर्तनाची सक्रिय घटक म्हणून समोर आली आहे.

वृद्धत्वाचे समाजशास्त्र हा त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा आयाम आहे. बदलत्या कुटुंबव्यवस्थेमुळे वृद्धांच्या जीवनावर होणारे परिणाम, वृद्धाश्रमांची वाढ, वृद्धांचे सामाजिक-मानसिक प्रश्न आणि कौटुंबिक आधाराचा अभाव या विषयांवरील त्यांच्या संशोधनाने वृद्धत्वाच्या प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधले. वृद्ध ही केवळ कल्याणकारी योजनांची लक्ष्यगट नसून सन्मानाने जगण्याचा हक्क असलेली व्यक्ती आहे, ही भूमिका त्यांच्या संशोधनातून ठळकपणे व्यक्त झाली आहे.

संशोधन मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. एम. ए., एम.फिल आणि पीएच.डी., आणि पोस्ट-डॉक्टोरेट (पी. डी.एफ.) स्तरावर त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. या संशोधन प्रबंधांचे विषय पाहिले, तर समाजातील विविध घटकांचे जीवनविश्व उलगडताना दिसते. दलित व मागासवर्गीय समाज, आदिवासी समुदाय, कामगार, महिला, वृद्ध, अपंग, विधीसंघर्षित बालके, पोलीस व्यवस्था, स्वयं-सहायता गट आणि विस्थापित लोकसंख्या इत्यादी. या संशोधनातून समाजातील संरचनात्मक विषमता, सामाजिक नियंत्रण आणि बदलत्या सामाजिक मूल्यांचे विश्लेषण झाले.

प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचे पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.) संशोधनासाठी डॉ. राजेंद्र बगाटे यांना अनमोल मार्गदर्शन लाभले आहे, तर पीएच.डी. पदवी संशोधनासाठी डॉ. ए.डी. साबळे, डॉ. डी.एस. कोरे, डॉ. स्नेहलता मानकर, डॉ. नारायण बोराडे, डॉ. सुनिता अंकुश (वाघमारे), डॉ. डी.डी. घोडगे, डॉ. डी.एल. तोरवणे, डॉ. अरुंधती पाटील, डॉ. प्रशांत सोनवणे, डॉ. शिवकुमार सोळंके, डॉ. शोभा इंगळे, डॉ. राजेंद्र बगाटे, डॉ. आरती धनवे, डॉ. मंगलमुर्ती धोकटे, डॉ. संदीप चौधरी, डॉ. रुपसी दास, डॉ. गणेश मोकासरे, डॉ. रेवणनाथ काळे, डॉ. अंबिका दत्ता, डॉ. वैशाली जाधव, सुजाता पाटील आणि सविता कोटूरी इत्यादी संशोधकांना अनमोल मार्गदर्शन लाभले आणि लाभत आहे. तसेच अनेक माझ्यासह अनेक विद्यार्थ्यांना एम.फिल. पदवीसाठी अनमोल मार्गदर्शन लाभले आणि लाभत आहे.

मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक सूचना दिल्या नाहीत, तर संशोधनातील नैतिकता आणि सामाजिक जबाबदारीचे भान दिले. माहिती संकलन करताना प्रतिसादकर्त्यांचा सन्मान, निष्कर्ष मांडताना वस्तुनिष्ठता आणि निष्कर्षांचा समाजासाठी होणारा उपयोग या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला आहे. त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले संशोधन केवळ विद्यापीठीय निकष पूर्ण करणारे न राहता समाजोपयोगी ठरत आहे.

पोस्ट-डॉक्टोरल (पी.डी.एफ.) संशोधन मार्गदर्शन हे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांच्या शैक्षणिक कार्याचे वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (आय.सी.एस.एस.आर.), नवी दिल्ली अंतर्गत त्यांनी पोस्ट-डॉक्टोरल (पी.डी.एफ.) संशोधनासाठी डॉ. राजेंद्र बगाटे यांना प्रॉब्लेम्स ऑफ एल्डरली लिविंग इन ओल्ड एज होम्स इन महाराष्ट्रा' या वृद्धांशी संबंधित संशोधन विषयावर मार्गदर्शन केले आहे. महाराष्ट्रात समाजशास्त्र विषयातील पहिल्या पोस्ट-डॉक्टोरल संशोधनाची परंपरा घडवण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. वृद्धाश्रमातील वृद्धांचे सामाजिक, आर्थिक आणि मानसिक प्रश्न, त्यांची सामाजिक-मानसिक अवस्था, कौटुंबिक नात्यांतील बदल, कौटुंबिक आधाराचा अभाव आणि सामाजिक प्रतिष्ठेचे प्रश्न या विषयावर झालेल्या पोस्ट-डॉक्टोरल संशोधनातून समाजधोरणांसाठी उपयुक्त निष्कर्ष पुढे आले आहेत.

ग्रंथनिर्मिती आणि लेखन हे त्यांच्या शैक्षणिक योगदानाचे महत्त्वाचे साधन राहिले आहे. समाजशास्त्रीय संज्ञा, स्वयं-सहायता गट आणि लिंगभाव समता यांसारख्या विषयांवरील त्यांची पुस्तके विद्यार्थ्यांसाठी आणि संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरली. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत त्यांनी लेखन केले असून, त्यामुळे स्थानिक सामाजिक प्रश्नांची मांडणी व्यापक शैक्षणिक वर्तुळात पोहोचली आहे. संशोधन नियतकालिके, संपादित ग्रंथ आणि परिषद कार्यवृत्तांमधील त्यांचे लेख समाजशास्त्रीय चर्चेला दिशा देणारे ठरले आहेत.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमधील सहभागाने त्यांच्या कार्याला व्यापक परिमाण लाभले. वृद्धत्व, लिंगभाव असमानता, विश्रांतीकालीन जीवन आणि सामाजिक विकास अशा विषयांवरील शोधनिबंध त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर सादर केले. या अनुभवांचा लाभ त्यांच्या अध्यापन आणि संशोधनात झाला आणि भारतीय समाजातील प्रश्नांचे जागतिक समाजशास्त्रीय चौकटीत विश्लेषण शक्य झाले.

समाजशास्त्र हे केवळ अकादमिक क्षेत्रापुरते मर्यादित नसून ते सामाजिक कृतीशी जोडलेले असावे, हा विश्वास त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिला. महिला संघटना, महिला सुरक्षा समित्या, जनशिक्षण संस्थान आणि ग्राहक चळवळीतील सहभागातून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. संशोधनातून निष्पन्न झालेले निष्कर्ष समाजकार्याच्या माध्यमातून प्रत्यक्ष समाजात उतरवण्याचा त्यांचा प्रयत्न सातत्याने दिसतो.

विद्यापीठीय प्रशासन आणि शिक्षक संघटनांमध्येही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अनेक वर्ष त्या समाजशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख राहिल्या असून त्यांनी विद्यापीठांमध्ये अधिसभा सदस्यासह अनेक महत्वपूर्ण पदांवर काम केले आहे. या पदांवर असतांना त्यांनी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यापैकी कुणालाही त्रास दिलेला नाही, तर प्रत्येकाच्या अडचणी समजून घेवून त्या सोडवल्या आहेत आणि आज पण सोडवत आहेत. शिक्षक संघटनेतील जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनी शैक्षणिक लोकशाही, पारदर्शकता आणि सहकार्य या मूल्यांचा पुरस्कार केला. सहकारी आणि कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी त्या नेहमीच मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान राहिल्या आहेत.

प्रा. डॉ. स्मिता अवचार यांच्या कार्याचे सर्वात प्रभावी प्रतिबिंब म्हणजे गुरू-शिष्य परंपरा होय. गुरू म्हणून त्यांनी अधिकार गाजवण्याऐवजी विश्वास निर्माण केला. संशोधनातील अडचणी, क्षेत्रकार्याचे अनुभव आणि सैद्धांतिक संभ्रम या सर्व बाबींवर त्यांनी संयमाने मार्गदर्शन केले. त्यामुळेच त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये केवळ संशोधक नव्हे, तर सामाजिकदृष्ट्या जागरूक माणसे घडली आहेत.

या संदर्भात माझा म्हणजेच डॉ. राजेंद्र बगाटे यांचा वैयक्तिक अनुभव विशेष उल्लेखनीय ठरतो. एम.ए., नेट-जेआरएफ, एम.फिल., पीएच.डी. आणि पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.) संशोधन या सर्व शैक्षणिक टप्प्यांवर एकाच गुरूच्या मार्गदर्शनाखाली घडणे ही दुर्मीळ बाब आहे. या संपूर्ण प्रवासात प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांनी केवळ संशोधनविषयक मार्गदर्शन केले नाही, तर शैक्षणिक प्रामाणिकपणा, सामाजिक संवेदनशीलता आणि माणुसकीची मूल्ये रुजवली आहेत. संशोधन म्हणजे केवळ पदवी मिळवणे नसून समाजासाठी काहीतरी देण्याची जबाबदारी आहे, ही शिकवण त्यांच्या मार्गदर्शनातून मिळाली आहे.

प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांना देण्यात आलेल्या जीवन गौरव पुरस्काराचे महत्त्व या सर्व पार्श्वभूमीवर अधिक खोलवर समजते. हा पुरस्कार म्हणजे प्रदीर्घ सेवेला दिलेला सन्मान असला, तरी तो समाजशास्त्र या विषयाच्या सामाजिक उपयोगितेची सार्वजनिक कबुली आहे. समाजातील दुर्बल घटकांचे प्रश्न, महिलांचे सक्षमीकरण, वृद्धांचे सन्मानजनक जीवन आणि विकासातील मानवी पैलू या सर्व विषयांना शास्त्रीय अधिष्ठान देण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. त्याचीच ही औपचारिक पावती आहे.

समारोप करताना असे म्हणावे लागेल की, प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांना प्रदान करण्यात आलेला जीवन गौरव पुरस्कार हा त्यांच्या वैयक्तिक यशाचा क्षण असला, तरी तो महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्र क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. समाजशास्त्राच्या माध्यमातून समाज अधिक समताधिष्ठित, संवेदनशील आणि न्याय्य व्हावा, या उद्देशाने त्यांनी जे कार्य केले, त्याची दखल या पुरस्कारातून घेतली गेली आहे. त्यांच्या ज्ञानाने, मार्गदर्शनाने आणि मूल्यांनी घडलेली पिढी हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे. समाजशास्त्राच्या सेवाव्रताचा हा प्रवास दीर्घकाळ प्रेरणादायी ठरो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचे एम.ए.,**
**नेट-जेआरएफ, एम.फिल., पीएच.डी. आणि पोस्ट-डॉक्टोरेट**
**(पी.डी.एफ.) चे विद्यार्थी आहेत)**
**ईमेल** - bagate.rajendra5gmail.com

# बाबासाहेबांचे विचार कृतीत उतरवणारे शिक्षणमहर्षी डॉ. एस. एस. बनसोड- प्राचार्य डॉ. शिवाजी सूर्यवंशी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ 'प्रतिनिधी/** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार केवळ वाचणे सोपे आहे, पण ते विचार प्रत्यक्ष आयुष्यात जगणे आणि त्यातून समाजाचे उत्थान करणे हीच खरी समाजसेवा आहे. डॉ. एस. एस. बनसोडे यांनी आपले संपूर्ण आयुष्य बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानासाठी समर्पित केले. ते खऱ्या अर्थाने विचार कृतीत उतरवणारे 'शिक्षणमहर्षी' होते, असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत आणि प्राचार्य डॉ. शिवाजी सूर्यवंशी यांनी केले.

कालकथित डॉ. श्रीपतराव एस. एस. बनसोडे यांच्या ८० व्या जयंतीनिमित्त आणि सिद्धार्थ एज्युकेशन सोसायटीच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी कृतज्ञता, प्रेरणा आणि आठवणींचा त्रिवेणी संगम उपस्थितांना अनुभवायला मिळाला.

प्राचार्य सूर्यवंशी पुढे म्हणाले की, तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी पछाडलेला माणूस समाजात केवढी मोठी क्रांती घडवू शकतो, याचे जिवंत उदाहरण म्हणजे बनसोडे सर आहेत. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत संस्थेचे रोपटे लावले, ज्याचा आज वटवृक्ष झाला आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेक शिक्षकांनी व कर्मचाऱ्यांनी ६ ते १० वर्षे विनावेतन काम केले, ही बाब त्यांच्या कार्याची पावती आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा संस्थेच्या सचिव प्रमिलाताई गायकवाड यांनी बनसोडे सरांच्या दूरदृष्टीचा आणि माणुसकीचा उल्लेख करत अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. सुभेदार रामजी हायस्कूलचे मुख्याध्यापक दीपक बनसोडे यांनी कुटुंबावर ओढवलेल्या दुःखद प्रसंगांनंतरही संस्थेचा रथ न थांबवता तो पुढे नेण्यासाठी करावा लागलेला संघर्ष मांडला, तेव्हा उपस्थितांचे डोळे पाणावले.

विद्यार्थी सत्कार: विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

सांस्कृतिक मानवंदना: सुजाता गायकवाड, कालिदास काकूळते, विजय राठोड आणि महेंद्र वानखेडे यांनी 'एस. एस. बनसोडे यांचा पाळणा' सादर केला. संदीप बसैय्ये, प्रेरणा वाहुळे आणि



अजिंक्य लिंगायत यांनी सादर केलेल्या कवितांनी कार्यक्रमात रंगत भरली.

स्मृती जागर: जागृती बनसोडे यांनी आपल्या आई-वडिलांच्या त्यागाचा आणि संस्थेच्या उभारणीतील खडतर प्रवासाचा उलगडा केला.

जालना येथे सुरू झालेल्या नवीन शाखेचा उल्लेख करत, बनसोडे सरांचे विविध विद्याशाखा सुरू करण्याचे स्वप्न लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कोणत्याही संकटात न डगमगता संस्थेला अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन प्राचार्य सूर्यवंशी यांनी केले.या सोहळ्याला प्रमिलाताई गायकवाड, प्राचार्य डॉ. शिवाजी सूर्यवंशी, दीपक बनसोडे, पांडुरंग सोनकांबळे, रोहित बनसोडे, मनोरमा तिजारे, सुजाता गायकवाड यांच्यासह बनसोडे परिवारातील सदस्य, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टीत संत सेवालाल महाराज जयंतीचा जल्लोष; पारंपारिक नृत्याने आणि सामाजिक उपक्रमाने वेधले लक्ष

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी (प्रतिनिधी)** क्रांतिकारक आणि थोर समाजसुधारक संत सेवालाल महाराज यांची जयंती आष्टी शहरात अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. बंजारा संस्कृतीचे दर्शन घडवणारे पारंपारिक नृत्य आणि सामाजिक बांधिलकी जपणारे रक्तदान शिबिर हे या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले.या उत्सवाच्या निमित्ताने बंजारा समाजाने आपल्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन घडवले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण बंजारा तरुण आणि महिलांनी सादर केलेले पारंपारिक नृत्य होते. अंगावर भरजरी पारंपारिक वेशभूषा, वैशिष्ट्यपूर्ण दागिने आणि लोकगीतांच्या तालावर धरलेला फेर यामुळे उपस्थित मंत्रमुग्ध झाले. संपूर्ण आष्टी शहर 'जय सेवालाल'च्या जयघोषाने दुमदुमून गेले होते.केवळ उत्सव साजरा न करता सामाजिक उत्तरदायित्व जपण्यासाठी या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला तरुणांनी मोठा प्रतिसाद दिला, ज्यामुळे उत्सवात एक वेगळाच आदर्श निर्माण झाला.

**सेवालाल महाराजांच्या विचारांची आज समाजाला गरज: राहुल लोणीकर**

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून भाजप प्रदेश सचिव राहुल लोणीकर उपस्थित होते. महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, संत सेवालाल महाराज यांची शिकवण केवळ एका समाजापुरती मर्यादित नसून ती संपूर्ण मानवजातीला दिशा देणारी आहे. त्यांचे सत्य, अहिंसा आणि सदाचाराचे विचार आजच्या काळातही तितकेच सुसंगत आहेत.



**अनिष्ट प्रथांना मूठमाती देऊन शिक्षणाकडे वळा: शिवनारायण राठोड**

गोरसिकवाडीचे प्रवक्ते शिवनारायण राठोड यांनी आपल्या व्याख्यानातून बंजारा समाजाचा गौरवशाली इतिहास उपस्थितांसमोर मांडला. संत सेवालाल महाराजांनी समाजाला व्यसनाधीनता आणि अंधश्रद्धेपासून दूर राहण्याचा संदेश दिला होता, याची आठवण करून देत त्यांनी समाजातील अनिष्ट प्रथांना मूठमाती देऊन तरुणांनी शिक्षणाकडे वळावे, असे आवाहन केले.या सोहळ्यासाठी आष्टी परिसरातील बंजारा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी आणि समाजबांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'उबाठा'ची काँग्रेसपुढे लाचारी आणि पवारांची गुलामी

आत्ताच एक्सप्रेस

मुंबई/प्रतिनिधी/ राज्यसभेच्या एका जागेवरून महाविकास आघाडीत (मविआ) सुरू असलेल्या संघर्षावरून भारतीय जनता पार्टीने उबाठा गट आणि संजय राऊत यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. उद्धव ठाकरेंना पुन्हा आमदार करण्यासाठी आणि स्वतःची खासदारकी टिकवण्यासाठी संजय राऊत काँग्रेसपुढे लाचारी पत्करत असून शरद पवारांचे गुलाम झाले आहेत, असा घणाघात भाजपाचे प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी सोमवारी केला.

भाजपा प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

मविआमध्ये 'तीन तिगाडा काम बिगाडा'

राज्यसभेच्या जागेवरून महाविकास आघाडीत विसंवाद असल्याचे सांगत श्री. बन म्हणाले की, सध्या मविआमध्ये 'तीन तिगाडा काम बिगाडा' अशी स्थिती आहे.

संजय राऊत विधान परिषदेची जागा उद्धव ठाकरेंना मिळावी अशी मागणी करत आहेत, मात्र काँग्रेसने त्यावर अटी घातल्या आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले आहे की, जोपर्यंत राज्यसभा काँग्रेसला मिळत नाही, तोपर्यंत उबाठाला विधान परिषद देण्याचा विचार होणार नाही. ही पूर्णपणे लाचारीची अवस्था आहे.

राऊतांचा प्रियांका चतुर्वेदींना डावलण्याचा प्रयत्न?

संजय राऊत यांच्या रणनीतीवर टीका करताना बन म्हणाले की, स्वतःची मुदत संपल्यानंतर पुन्हा खासदार होण्यासाठी राऊत आतापासूनच हालचाली करत आहेत.

प्रियांका चतुर्वेदी यांचा पत्ता कट करून शरद पवारांनी राज्यसभेवर जावे, यासाठी राऊत आग्रही आहेत. उबाठा गटामध्येही आता दोन गट पडले असून, एक गट राऊतांच्या बाजूने (पवारांसाठी) तर दुसरा गट प्रियांका चतुर्वेदी यांच्यासाठी आग्रही असल्याचे त्यांनी नमूद केले.

# फुलंब्रीत 'यमदूत' बनून उभे आहेत अवैध होर्डिंग्ज; नगरपंचायत प्रशासनाचे डोळे मिटले की मोठी दुर्घटना घडण्याची प्रतीक्षा?

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** मृत्यू कधी, कुठे आणि कोणत्या रूपाने समोर येईल याचा नेम नाही, पण फुलंब्री शहरात मात्र हा मृत्यू 'अवैध होर्डिंग्ज'च्या रूपात जागोजागी उभा ठाकलेला दिसत आहे. शहरातून जाणाऱ्या प्रमुख महामार्गांवर होर्डिंग्जचा असा काही ऊत आला आहे की, जणू हे रस्ते नसून जाहिरातींचे जंगल झाले आहे. औरंगाबादमध्ये नुकत्याच घडलेल्या दुर्घटनेत एका निष्पाप कामगाराचा बळी गेला असतानाही, फुलंब्री नगरपंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभाग अद्याप गाढ झोपेत असल्याचे चित्र आहे.



**राजकीय चमकोगिरी आणि व्यापार्यांचा विळखा**

औरंगाबाद-जळगाव रस्ता असो वा फुलंब्री-खुलताबाद रस्ता, या दोन्ही प्रमुख मार्गांवर नेत्यांचे वाढदिवस, सत्कार आणि व्यापाऱ्यांच्या जाहिरातींचे मोठमोठे कटआऊट्स आणि बॅनर लटकलेले आहेत. नियमांची पायमल्ली करून लावलेले हे अनधिकृत होर्डिंग्ज वादळ-वाऱ्यात कोणाच्या अंगावर पडतील आणि कोणाचा जीव घेतील, याची शाश्वती राहिलेली नाही. रस्ते सुरक्षेपेक्षा आपली 'चमकोगिरी' महत्त्वाची मानणाऱ्या लोकांमुळे सर्वसामान्यांचा जीव टांगणीला लागला आहे.

**विजेचे खांब ठरताहेत शोभेची वस्तू!**

शासनाने लाखो रुपये खर्चून महामार्गावर जे विजेचे खांब उभे केले आहेत, ते सध्या फक्त अवैध होर्डिंग्ज लावण्यासाठीचे स्टँड बनले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, या खांबांवरील दिवे मात्र गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहेत.जग अंधारातून प्रकाशाकडे जात असताना, फुलंब्री शहर मात्र प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे अंधारात ढकलले जात आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

**प्रशासनाचा 'अर्थपूर्ण' कानाडोळा?**

शहरातील या गंभीर समस्येकडे नगरपंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. ही डोळेझाक नेमकी कशामुळे? एखाद्या निष्पाप नागरिकाचा बळी गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येईल का? असा जळजळीत सवाल आता विचारला जात आहे.

शहरातील सर्व अवैध होर्डिंग्ज तात्काळ हटवून रस्ते मोकळे करावेत.विजेच्या खांबांवरील जाहिराती काढून बंद पडलेले पथदिवे सुरू करावेत.नियम मोडणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करावी.

थोडक्यात सांगायचे तर, फुलंब्री शहराला या होर्डिंग्जच्या विळख्यातून मुक्त करून नागरिकांना मोकळा श्वास घेऊ द्यावा, अन्यथा भविष्यात घडणाऱ्या दुर्घटनेला सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल.

## संक्षिप्त

### सैनिक कल्याण विभाग; लिपिक टंकलेखक पदासाठी ऑनलाईन परीक्षा १४ मार्च रोजी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**सैनिक कल्याण विभागात लिपिक टंकलेखक (गट-क) एकूण ७२ पदांसाठी भरती होणार आहे. त्यासाठी टीसीएस-आयओएन यांच्यामार्फत ऑनलाईन परीक्षा होणार आहे. ही परीक्षा शनिवार दि.१४ मार्च २०२६ रोजी दुपारी १ ते ३ यावेळेत होणार आहे,असे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी कळविले आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयात संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त अभिवादन



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. नायब तहसिलदार रेवणनाथ ताठे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# गंगापूर व लासुर स्टेशन येथील शासकीय मका खरेदी केंद्राचे उद्दिष्ट तात्काळ वाढवा; अन्यथा 'भावांतर योजना' लागू करा - विशाल पाटील लांडगे यांची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी/** गंगापूर तालुक्यातील गंगापूर आणि लासुर स्टेशन येथील शासकीय हमीभाव मका खरेदी केंद्रांचे उद्दिष्ट संपल्याचे कारण देत खरेदी बंद करण्यात आली आहे. यामुळे शेकडो नोंदणीकृत शेतकरी हवालदिल झाले असून, त्यांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर, ग्राम संवाद सरपंच संघटनेचे प्रदेश सचिव विशाल पाटील लांडगे यांनी तहसीलदार यांना निवेदन देऊन मका खरेदीचे उद्दिष्ट वाढवण्याची किंवा शेतकऱ्यांना 'भावांतर योजना' लागू करण्याची आक्रमक मागणी केली आहे.

शेतकऱ्यांची फसवणूक आणि आर्थिक नुकसान:

शासनाने मका पिकासाठी २४०० रुपये प्रति क्विंटल असा हमीभाव जाहीर केला होता. त्यानुसार तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. मात्र, प्रशासनाने खरेदी प्रक्रिया उशिरा सुरू केली आणि अत्यल्प खरेदी करून अचानक 'उद्दिष्ट पूर्ण' झाल्याचे सांगत केंद्रे बंद केली. परिणामी, नोंदणी करूनही शेतकऱ्यांना आपला माल हमीभावात विकता येत नाहीये. सध्या बाजारात मक्याला केवळ १४०० रुपये प्रति क्विंटल असा दर मिळत असल्याने शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १००० रुपयांचा थेट तोटा सहन करावा लागत आहे.

निवेदनातील मुख्य मागण्या:

विशाल पाटील लांडगे यांनी सादर केलेल्या निवेदनात प्रामुख्याने दोन मागण्या करण्यात आल्या आहेत.१. गंगापूर व लासुर स्टेशन केंद्रांचे मका खरेदी उद्दिष्ट तात्काळ वाढवून सर्व नोंदणीकृत शेतकऱ्यांचा माल २४०० रुपये दराने खरेदी करावा.

२. जर उद्दिष्ट वाढवणे शक्य नसेल, तर हमीभाव (२४०० रु.) आणि बाजारभाव (१४०० रु.) यातील १००० रुपयांचा फरक 'भावांतर योजना' किंवा 'भाव फरक योजना' अंतर्गत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावा.प्रशासनाने यावर तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास, नोंदणीकृत शेतकऱ्यांसह तीव्र आंदोलन आणि आमरण उपोषण करण्याचा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर संतोष पाटील आघाडे, प्रदीप पाटील चव्हाण, गुलाब शहा, गणेश मांडवगड यांच्या स्वाक्षऱ्या असून, यावेळी कमलेश राजपूत, शिवाजी मांडवगड यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. आता यावर शासन आणि प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

**जा.क्र/मनधा/माहिती व जनसंपर्क /२०२/४२**

**दिनांक: २३/ ०२/ २०२६**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे सर्व संबंधित नागरिक, संस्था, जाहिरातदार व राजकीय पक्ष यांना जाहीर करण्यात येते की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील विजेचे खांब, रस्त्यांच्या कडेला, सार्वजनिक ठिकाणी तसेच कोणत्याही धोकादायक किंवा जोखमीच्या जागेवर अनधिकृतपणे लावण्यात आलेले होर्डिंग, बॅनर, पोस्टर, शुभेच्छा फलक इत्यादी संबंधितांनी स्वतःहून २४ (चोवीस) तासांच्या आत काढून घ्यावेत.

निर्दिष्ट मुदतीत अनधिकृत साहित्य न काढल्यास संबंधितांवर खालील कायद्यांनुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्र मालमत्ता विरूपणास प्रतिबंध अधिनियम, १९९५ चे कलम ३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २४४ व २४५. याशिवाय, अशा अनधिकृत होर्डिंग/बॅनरमुळे कोणतीही जीवितहानी किंवा अपघात झाल्यास संबंधित व्यक्ती/संस्था यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, याची सर्वांनी गंभीर नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/-**

**(जी. श्रीकांत)**

**आयुक्त,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका.**

### रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी 'RPF' सज्ज

**नांदेड विभागात गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या, हरवलेला ऐवज प्रवाशांना परत**

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/ प्रतिनिधी/** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने प्रवाशांची सुरक्षा आणि त्यांच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' व 'ऑपरेशन अमानत' अंतर्गत विशेष मोहीम तीव्र केली आहे. गेल्या काही दिवसांत आरपीएफ (RPF) आणि जीआरपी (GRP) यांनी केलेल्या संयुक्त कारवाईत अनेक सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात आली असून, प्रवाशांचे हरवलेले मौल्यवान सामान त्यांना सन्मानपूर्वक परत करण्यात आले आहे.

**महत्त्वाच्या कारवाया आणि अटक सत्र**

रेल्वे पोलिसांनी विविध स्थानकांवर सापळा रचून चोरीचे प्रयत्न हाणून पाडले आहेत.नांदेड स्थानक (१८ फेब्रुवारी २०२६): प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर प्रवाशांचे सामान लंपास करण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन संशयित आरोपींना आरपीएफ आणि जीआरपीच्या संयुक्त पथकाने रंगेहात पकडले. त्यांच्यावर कायदेशीर गुन्हे दाखल




करण्यात आले आहेत.छत्रपती संभाजीनगर (१८ फेब्रुवारी २०२६): ओखा-रामेश्वरम साप्ताहिक एक्सप्रेसच्या निगराणी दरम्यान एका सराईत गुन्हेगाराला अटक करण्यात आली. त्याच्याकडून चोरीचा मोबाईल जप्त करण्यात आला असून, त्याने विदर्भ एक्सप्रेसमध्येही चोरी केल्याचे कबूल केले आहे. पुढील तपासासाठी त्याला जीआरपी चाळीसगावच्या ताब्यात देण्यात आले आहे.

परभणी स्थानक (२० फेब्रुवारी २०२६): तपोवन एक्सप्रेसमध्ये चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन महिला आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.'ऑपरेशन अमानत': विसरलेले सामान प्रवाशांच्या हाती.केवळ गुन्हेगारांना पकडणेच नव्हे, तर प्रवाशांचे विसरलेले सामान शोधून देण्यातही 'RPF' ने तत्परता दाखवली आहे:

जालना स्थानक: देवगिरी एक्सप्रेसमध्ये विसरलेला १३,००० किमतीचा मोबाईल पोलिसांनी शोधून काढला आणि योग्य पडताळणीनंतर तो प्रवाशाला परत केला.

नांदेड स्थानक: एका ज्येष्ठ नागरिक प्रवाशाची ६,००० किमतीच्या वस्तू असलेली बॅग विसरली होती. आरपीएफ जवानांनी ही बॅग शोधून सुरक्षितरीत्या त्यांच्या स्वाधीन केली.नांदेड विभागाचे वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त श्री. अमित प्रकाश मिश्रा यांनी प्रवाशांच्या सहकार्यावर भर दिला आहे. ते म्हणाले. प्रवाशांची सुरक्षा हीच आमची प्राथमिकता आहे. आरपीएफ सतत गस्त घालत असली, तरी प्रवाशांनी स्वतःच्या सामानाबाबत सतर्क राहणे आवश्यक आहे.गर्दीच्या ठिकाणी (प्लॅटफॉर्म, प्रतीक्षागृह) आपल्या मोबाईल आणि बॅगवर विशेष लक्ष ठेवा.

अनोळखी व्यक्तींशी वैयक्तिक माहिती शेअर करू नका.कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा व्यक्ती आढळल्यास तत्काळ रेल्वे हेल्पलाईन १३९ वर संपर्क साधा.

RPF आणि GRP मधील उत्तम समन्वय आणि तंत्रज्ञानाचा वापर यामुळे रेल्वे प्रवासातील गुन्हेगारीला लगाम बसत असल्याचे चित्र दिसत आहे. प्रवाशांनी सतर्क राहून प्रशासनाला सहकार्य केल्यास प्रवास अधिक सुखकर आणि सुरक्षित होईल.

# जालना: शिवछत्रपती महाविद्यालयात 'युवक महोत्सव २०२६' चा दिमाखदार प्रारंभ; 'रंग क्रीडेचे, ताल संस्कृतीचे' संकल्पनेतून तरुणाईचा जल्लोष

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, या उद्देशाने स्थानिक शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'युवक महोत्सव २०२६' चा उद्घाटन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. 'रंग क्रीडेचे, ताल संस्कृतीचे' या यंदाच्या वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनेने (थीम) संपूर्ण महाविद्यालयीन परिसर क्रीडा आणि संस्कृतीच्या रंगात न्हाऊन निघाला आहे.

महोत्सवाचे अधिकृत उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, युवक महोत्सव हा केवळ मनोरंजन किंवा स्पर्धांचा कार्यक्रम नसून, तो विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा आणि संघभावना वृद्धिंगत करण्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. शिक्षणासोबतच क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेतल्यास विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सकारात्मकता निर्माण होते.

मैदानी आणि बौद्धिक खेळांची मेजवानी

उद्घाटनानंतर महोत्सवाची सुरुवात महाराष्ट्राच्या मातीतील रांगड्या कबड्डी खेळाने झाली. मैदानावर खेळाडूंचा उत्साह आणि प्रेक्षकांच्या घोषणांनी वातावरण चैतन्यमय झाले होते.दुपारचे सत्र: बौद्धिक कौशल्याची कसोटी पाहणाऱ्या कॅरम आणि बुद्धिबळ स्पर्धा पार पडल्या. यात विद्यार्थ्यांनी कमालीची एकाग्रता दाखवत खेळाचे प्रदर्शन केले.सायंकाळचे सत्र: शक्ती आणि कौशल्याचा मेळ घालणाऱ्या थाळीफेक व गोळाफेक स्पर्धांनी पहिल्या दिवसाची सांगता झाली.



या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा विभागाचे संचालक डॉ. सुरेश नलावडे आणि प्रा. अरुणा दसपुते यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या शिस्तबद्ध नियोजनामुळे सर्व स्पर्धा सुरळीत पार पडल्या.

कार्यक्रमाचे महत्त्वाचे घटक सूत्रसंचालन: डॉ. तुकाराम गावंडे,आभार प्रदर्शन: डॉ. गांधी बाणायत उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, डॉ. हेमंत कुमार जैन, डॉ. भगवान जायभाय, डॉ. उत्तम जाधव, डॉ. हरिप्रसाद बिडवे, डॉ. सुभाष पोटभरे, डॉ. संतोष चव्हाण, प्रा. विनोद कांबळे, प्रा. संदीप सातोनकर, प्रा. सचिन कदम, सतीश वाघ, गजानन इंगळे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आगामी काही दिवस हे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी कला आणि क्रीडा गुणांच्या सादरीकरणाची मोठी पर्वणी ठरणार आहेत. 'रंग क्रीडेचे, ताल संस्कृतीचे' ही संकल्पना खऱ्या अर्थाने यशस्वी होताना दिसत आहे.

## लासुर स्टेशन येथील शिवना इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'फॅन्सी ड्रेस' स्पर्धेचा मोठा उत्साह; चिमुकल्यांच्या कलागुणांना मिळालं व्यासपीठ

**आत्ताच एक्सप्रेस**

**लासुर स्टेशन (प्रतिनिधी)** गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथील शिवना इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये २१ फेब्रुवारी रोजी 'फॅन्सी ड्रेस' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहात सहभाग नोंदवत आपल्या अंगी असलेल्या कलागुणांचे सादरीकरण केले.

विविध वेशभूषांनी वेधले लक्ष

या स्पर्धेचे मुख्य आकर्षण म्हणजे चिमुकल्या विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विविध भूमिका. ऐतिहासिक पात्रे, सामाजिक संदेश देणारी रूपे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांच्या वेशभूषेतून विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणातून त्यांची कल्पकता आणि आत्मविश्वास दिसून आला.




या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सौ. सविता अविनाश संगेकर उपस्थित होत्या. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संध्या तांबट यांचीही प्रमुख उपस्थिती होती. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या व्यवस्थापन समितीने आणि शिक्षक वृंदाने विशेष परिश्रम घेतले. यामध्ये प्रामुख्याने मार्गदर्शन: शाळेचे संचालक विशाल गायकवाड सर आणि नगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्या तथा महिला व बालकल्याण सभापती सौ. वर्षाताई गायकवाड,नियोजन: मुख्याध्यापिका सौ. संध्या तांबट, शिक्षिका कु. स्नेहा त्रिभुवन आणि वैशाली जाधव,तसेच शिक्षक दीपाली चव्हाण, कृष्णा जाधव, रितिका झांबड, रजनी त्रिभुवन, भारती मिठ्ठे, पूजा ताठे, शितल डगळे, प्रियंका दवंडे, सचिन देहाडे, आकाश पवार यांच्यासह कर्मचारी पूजा नाडे, प्रीती घोडके यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे योगदान दिले.शिवना इंटरनॅशनल स्कूलने आयोजित केलेल्या या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करण्याची संधी मिळाली असून, पालकांनी आणि परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे.

# भूमि अभिलेख कर्मचाऱ्यांचे एल्गार! मागण्या मान्य न झाल्यास २ मार्चपासून राज्यभर 'बेमुदत' कामबंद आंदोलन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** प्रलंबित मागण्यांकडे वारंवार होणारे दुर्लक्ष आणि शासनाच्या वेळकाढू धोरणामुळे संतप्त झालेल्या भूमि अभिलेख कर्मचारी कृती समितीने आता आरपारची लढाई पुकारली आहे. न्याय्य हक्कांसाठी राज्यभरातील कर्मचारी आक्रमक झाले असून, येत्या १८ फेब्रुवारीपासून टप्प्याटप्प्याने आंदोलनाचा श्रीगणेशा करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, मागण्या मान्य न झाल्यास २ मार्च २०२६ पासून संपूर्ण राज्यात बेमुदत कामबंद करण्याचा इशारा समितीने दिला आहे.+४का पेटला असंतोष?कर्मचाऱ्यांच्या मते, शासनाने केवळ आश्वासनांची बोळवण केली आहे. या संतापामागे काही प्रमुख कारणे आहेत:आदेशाची पायमल्ली: मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाने (च-ढ) १४ जानेवारी २०२० रोजी आदेश देऊनही अद्याप तांत्रिक वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही.फसवे आश्वासन: जून २०२५ मध्ये झालेल्या बैठकीत १५० दिवसांच्या कृती कार्यक्रमात मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र ८ महिने उलटले तरी परिस्थिती 'जैसे थे' आहे.दबावतंत्राचा वापर: प्रशासन केवळ वेळकाढूपणा करून कर्मचाऱ्यांच्या घटनात्मक अधिकारांवर



गदा आणत असून दबावतंत्राचा वापर करत असल्याचा गंभीर आरोप कृती समितीने केला आहे.आंदोलनाची धगधगती रूपरेषाकृती समितीने आपला लढा खालील टप्प्यांत तीव्र करण्याचे जाहीर केले आहे:दिनांकआंदोलनाचे स्वरूप१८ फेब्रुवारी २०२६मोजणी साहित्य कार्यालयात जमा करणे आणि काळ्या फिती लावून कामकाज करणे.२० फेब्रुवारी २०२६मोजणीचे काम पूर्णपणे बंद ठेवणे.२३ ते २६ फेब्रुवारी २०२६संपूर्ण राज्यात सामूहिक रजा आंदोलन आणि असहकार पुकारणे.+१२७ फेब्रुवारी २०२६पुणे येथील जमाबंदी आयुक्त कार्यालयावर 'आक्रोश मोर्चा' व धरणे आंदोलन.०२ मार्च २०२६ पासूनबेमुदत कामबंद आंदोलन (मागण्या मान्य होईपर्यंत).प्रमुख मागण्या ज्यासाठी कर्मचारी उतरले रस्त्यावर:१. तात्काळ तांत्रिक वेतनश्रेणी लागू करणे.

२. विभागाचे खाजगीकरण करण्याचा निर्णय कायमचा रद्द करणे.

३. जमाबंदी आयुक्त पद हे आयएएस (ख-ड) ऐवजी भारतीय अभियांत्रिकी सेवेतून (खएड) भरणे.

४. कर्मचाऱ्यांवर विनापरवानगी थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याची अमानवी पद्धत बंद करणे.

५. प्रत्येक कर्मचाऱ्याला लॅपटॉप, रोव्हर आणि डेटा कार्ड यांसारखे स्वतंत्र मोजणी साहित्य पुरवणे.+४शासनाने आमच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. जर हे आंदोलन चिघळले, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल, असा स्पष्ट इशारा राज्य समन्वयक सुनील गोडसे, विभूतीचंद्र गजभिये आणि समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.+१या आंदोलनामुळे राज्यातील जमीन मोजणीची हजारो प्रकरणे ठप्प होण्याची शक्यता असून, सर्वसामान्यांचे हाल झाल्यास त्याला शासनच जबाबदार राहील, असा सूर कर्मचाऱ्यांमध्ये उमटत आहे.

# लोणी (परतूर) येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत भव्य सोहळा संपन्न

## आमदार बबनराव लोणीकर, अभिनेते भाऊ कदम आणि राहुल लोणीकर यांच्या उपस्थितीत सोहळा; गावच्या विकासाचे मान्यवरांकडून कौतुक

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी (प्रतिनिधी)** ग्रामीण भागाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्यासाठी राज्य सरकारने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' हाती घेतले आहे. याच अभियानांतर्गत लोणी (ता. परतूर) येथे एका भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते गावातील महिला बचत गटांना ०१ कोटी ८० लक्ष रुपयांच्या कर्जाच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले.

**१ कोटी ८० लाखांच्या कर्ज धनादेशाचे वाटप**

या कार्यक्रमाला भाजप प्रदेश सचिव राहुल लोणीकर, सुप्रसिद्ध सिने अभिनेते भाऊ कदम, सरपंच गजानन लोणीकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न साकार होत आहे.

कार्यक्रमात बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज हा देवेंद्र फडणवीस यांचा ग्रामीण भागाच्या विकासासाठीचा अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. गेल्या ४० वर्षांच्या राजकीय प्रवासात मी नेहमीच सामाजिक विषमता दूर करण्याचा आणि गावखेड्यातील प्रत्येक माणसाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामपंचायतींनी आता पुढाकार घेऊन स्वच्छता, शुद्ध पाणी आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधांसह महिला बचत गटांना सक्षम करणे आवश्यक आहे.

**तरुणांनी गावच्या विकासात झोकून द्यावे: राहुल लोणीकर**

भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी तरुण पिढीला आवाहन केले की, ग्रामीण भागात व्यसनमुक्त समाज आणि स्वच्छ-सुंदर गावे



निर्माण करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा. लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन काम केल्यास गावांचा कायापालट निश्चित आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**भाऊ कदम यांची फटकेबाजी आणि कौतुक**

आपल्या खुसखुशीत शैलीत संवाद साधताना सिने अभिनेते भाऊ कदम यांनी लोणी गावच्या विकासाचे तोंडभरून कौतुक केले. ते म्हणाले, लोणी गावाची पाहणी करताना येथील डिजिटल अंगणवाडी, बचत गटांची अद्ययावत लॅब आणि वीज-रस्त्यांची उत्तम व्यवस्था पाहून मी भारावून गेलो आहे. स्वच्छतेकडून आर्थिक समृद्धीकडे जाणारा हा प्रवास कौतुकास्पद आहे.

**लोणी गावचा 'आदर्श' प्रवास**

सरपंच गजानन लोणीकर यांनी प्रास्ताविकात सांगितले की, लोणी गावाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य, प्रशासन आणि बचत गटांनी एका साखळीप्रमाणे काम केले आहे. आमदार लोणीकर आणि राहुल भैया यांच्या मार्गदर्शनामुळेच १ कोटी ८० लाखांचा निधी बचत गटांपर्यंत पोहोचू शकला, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमापूर्वी मान्यवरांचे गावात वाजत-गाजत भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी गावातील विविध विकासकामांची पाहणी केली. गावातील बदललेले स्वरूप पाहून उपस्थितांनी सरपंच आणि ग्रामपंचायत प्रशासनाचे विशेष अभिनंदन केले.

# जालन्यात मका खरेदीचा पेच; खरेदी केंद्रांची संख्या आणि लक्षांक वाढवण्याची खासदार डॉ. कल्याण काळे यांची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यात यावर्षी मक्याचे विक्रमी उत्पादन झाले असताना, शासकीय खरेदीची संथ गती आणि अपुरा लक्षांक यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे.

या पार्श्वभूमीवर, जिल्ह्यात मका खरेदी केंद्रांची संख्या तात्काळ वाढवावी आणि जिल्ह्याचा खरेदी लक्षांक वाढवून मका खरेदीला गती द्यावी, अशी आग्रही मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जालना जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्राद्वारे केली आहे.

**उत्पादन १७ लाख क्विंटल, लक्षांक मात्र अल्प**

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी पत्रात जिल्ह्यातील मका उत्पादनाची आकडेवारी मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. त्यांनी नमूद केले की,पेरणी क्षेत्र: जिल्ह्यात सुमारे ५७,३४५ हेक्टरवर मक्याची पेरणी झाली असून, अंदाजे ६० हजार शेतकऱ्यांनी हे पीक घेतले आहे.

**अपेक्षित उत्पादन:** जिल्ह्यात अंदाजे १७ लाख क्विंटल मक्याचे उत्पादन झाले आहे.

**शासकीय लक्षांक:** एवढ्या मोठ्या उत्पादनासमोर शासनाने केवळ १,००,००० क्विंटलचा लक्षांक दिला आहे. त्यातही टप्प्याटप्प्याने मिळालेला प्रत्यक्ष लक्षांक फक्त ८,००० क्विंटल इतकाच आहे.

> जालना जिल्ह्यात मक्याचे सरासरी उत्पादन हेक्टरी २९.७६ क्विंटल झाले असताना, खरेदीचा वेग पाहता सामान्य शेतकऱ्याला आपला माल विकण्यासाठी महिनाभर वाट पाहावी लागेल की काय, अशी भीती निर्माण झाली आहे.
> **- खासदार डॉ. कल्याण काळे**

**खरेदीची गती अत्यंत संथ**

जिल्ह्यात सध्या मका खरेदीची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू असल्याबद्दल खासदारांनी संताप व्यक्त केला आहे. सद्यस्थितीतील वास्तव खालीलप्रमाणे आहे.



**केंद्रांची संख्या:** संपूर्ण जिल्ह्यात सध्या फक्त १० खरेदी केंद्रे कार्यरत आहेत.

**शेतकरी नोंदणी:** जिल्ह्यात २,२४६ शेतकऱ्यांनी मका विक्रीसाठी नोंदणी केली आहे, परंतु आतापर्यंत केवळ ५५ शेतकऱ्यांकडून मका खरेदी करण्यात आला आहे.

**प्रत्यक्ष खरेदी:** आजवर केवळ १,४८४ क्विंटल मका खरेदी झाला आहे, जो उत्पादनाच्या तुलनेत नगण्य आहे.

**शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी तात्काळ उपाययोजनांची मागणी**

व्यापाऱ्यांकडून होणारी लूट थांबवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना हमीभाव मिळवून देण्यासाठी डॉ. काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे खालील मागण्या केल्या आहेत.१. मका खरेदी केंद्रांची संख्या तात्काळ वाढवावी., २. मका खरेदीचा लक्षांक (Target) वाढवून मिळावा.,३. नोंदणीकृत सर्व शेतकऱ्यांचा मका प्राधान्याने खरेदी करावा.

यावेळी निवेदन देताना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, त्र्यंबकराव पाबळे, भाऊसाहेब साळुंके, विलास दानवे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. प्रशासनाने यावर तातडीने निर्णय न घेतल्यास शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होण्याची शक्यता आहे.

# जालना जिल्ह्यात ५ बालकामगारांची सुटका, मालकावर गुन्हा दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्ह्यात बालकामगार प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात विशेष शोध मोहीम राबवून ५ बालकामगारांची सुटका करण्यात आली. या प्रकरणी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एका आस्थापना मालकावर कठोर कारवाई करत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा बालकामगार अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली १६ ते १९ फेब्रुवारी दरम्यान ही विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेसाठी पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि 'चाइल्ड हेल्पलाईन'च्या प्रतिनिधींचे एक संयुक्त पथक तयार करण्यात आले होते. या पथकाने शहरातील विविध हॉटेल्स, दुकाने आणि लघु उद्योगांवर अचानक छापे टाकले.

या कारवाईत एकूण ५ मुले धोकादायक स्थितीत काम करताना आढळली.१४ वर्षांखालील बालक: १,१६ वर्षांवरील किशोरवयीन मुले: ४ या सर्व मुलांना पथकाने आपल्या ताब्यात घेतले असून, त्यांना तातडीने बालकल्याण समिती (उथउ) समोर हजर करण्यात आले. समितीच्या निर्णयानुसार आता या मुलांच्या शिक्षणाची आणि पुनर्वसनाची प्रक्रिया राबवली जाणार आहे.

**कायद्याचा बडगा: मालकावर गुन्हा**

बाल आणि किशोर कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम १९८६ नुसार, एका आस्थापना मालकावर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, बालकामगार ठेवणे हा अजामीनपात्र गुन्हा असून यामध्ये दोषी आढळल्यास:

किमान ३ महिने कारावास,२० हजार रुपयांपर्यंत दंड,अशा शिक्षेची तरतूद आहे.जिल्ह्यात कुठेही लहान मुले कामावर ठेवलेली आढळल्यास नागरिकांनी गप्प न बसता तत्काळ '१०९८' (Childline) या क्रमांकावर संपर्क साधावा. बालकांचे बालपण हिरावून घेणाऱ्यांविरुद्ध प्रशासन अशीच कठोर कारवाई सुरू ठेवणार आहे.

# 'सांगवे साहेब, राजकारणच करायचंय तर खुर्ची सोडा आणि मैदानात या!'

**: खळबळजनक :**

**शासकीय सेवेत असूनही बोरी ग्रामसभेत 'राजकीय नेत्या'सारखा वावर; कृषी पर्यवेक्षक सांगवे यांच्या चौकशीची मागणी**

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर (प्रतिनिधी)** शासकीय नोकरी करायची की कंत्राटी राजकारण? असा संतप्त सवाल आता परतूरच्या कृषी कार्यालयातील कृषी पर्यवेक्षक सांगवे यांच्या बाबतीत उपस्थित केला जात आहे. नांदेड जिल्ह्यातील बोरी ग्रामपंचायत मध्ये ६ तारखेला झालेल्या ग्रामसभेत सांगवे यांनी जो 'अवतार' धारण केला, त्यावरून आता त्यांच्या



निलंबनाची मागणी जोर धरू लागली आहे.

बोरी गावातील जागरूक नागरिकांनी सरपंच आणि ग्रामसेवक यांच्या कारभारावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करत प्रश्नांची सरबत्ती केली होती. नियमानुसार, या प्रश्नांना उत्तर देण्याची जबाबदारी सरपंच किंवा ग्रामसेवकाची असते. मात्र, सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला जेव्हा तिथे उपस्थित असलेले शासकीय कर्मचारी सांगवे एखाद्या मुरब्बी राजकीय नेत्याप्रमाणे पुढे सरसावले.

**कोणत्या अधिकारात उत्तर दिले?:** शासकीय सेवेत असताना सांगवे यांना ग्रामपंचायतीच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांवर उत्तर देण्याचा अधिकार कुणी दिला? ते सरपंच आहेत की ग्रामसेवक?

**नागरिकांना धमकावल्याचा आरोप:** ग्रामसभेत भ्रष्टाचाराचे प्रश्न विचारणाऱ्या ग्रामस्थांना उत्तरे देण्याऐवजी, सांगवे यांनी त्यांना धमकावल्याचा गंभीर आरोप प्रभाकर व्यवहारे यांनी केला आहे.

**रजेचा पेच:** ६ तारखेला सांगवे कर्तव्यावर होते की रजेवर? जर रजेवर असतील, तर रजेच्या काळात अशा प्रकारे राजकीय हस्तक्षेप करून शासकीय नियमावलीचा भंग का केला?

**साळवे मॅडम, चौकशी होणार का?**

या संपूर्ण प्रकरणावर आता साळवे मॅडम (संबंधित वरिष्ठ अधिकारी) यांच्याकडे बोट दाखवले जात आहे. प्रभाकर व्यवहारे यांनी थेट प्रश्न उपस्थित केला आहे की,सांगवे यांनी त्या दिवशी रजा घेतली होती का, याची सखोल चौकशी होणार का?

एका शासकीय कर्मचाऱ्याला आपल्या कार्यक्षेत्राच्या बाहेरील ग्रामसभेत राजकीय वादात पडण्याची मुभा आहे का? कर्तव्यात कसूर करणाऱ्या आणि सत्तेचा गैरवापर करणाऱ्या या 'राजकीय' कर्मचाऱ्यावर निलंबनाची कारवाई होणार का?

जर सांगवे यांना गुत्तेदारी आणि राजकारणच करायचे असेल, तर त्यांनी तातडीने कृषी पर्यवेक्षक पदाचा राजीनामा द्यावा आणि मग खुशाल राजकारण करावे. शासकीय पगार घेऊन राजकारण खपवून घेतले जाणार नाही.

**- प्रभाकर व्यवहारे (मागणीकर्ते)**

# जालन्याच्या शिरपेचात मानाचा तुरा: अंकुशराव टोपे कनिष्ठ महाविद्यालयास 'अ+' दर्जा प्राप्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या येथील अंकुशराव टोपे कनिष्ठ महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात पुन्हा एकदा आपली मोहोर उमटवली आहे. राज्य शैक्षणिक



संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे यांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा (SQAAF) अंतर्गत महाविद्यालयाला 'अ+' (+) हा सर्वोच्च दर्जा बहाल करण्यात आला आहे.

जालना जिल्ह्यातील केवळ पाच संस्थांना हा बहुमान मिळाला असून, त्यात टोपे महाविद्यालयाने आपले स्थान निश्चित करून गुणवत्तेचा झेंडा फडकवला आहे.

**काय आहे 'SQAAF' मूल्यांकन?**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्य शासनाने शाळा मानक प्राधिकरणाची स्थापना केली. याअंतर्गत राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांसाठी 'शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा' तयार करण्यात आला होता.

सहभाग: राज्यातील एकूण १,०२,६७५ शाळांनी यात सहभाग नोंदवला.निवड: सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या १०,६४४ शाळांचे शासकीय समितीमार्फत कडक 'बाह्य मूल्यांकन' करण्यात आले. निकाल: कडक निकषांनंतर संपूर्ण राज्यातून केवळ ४२९ शाळा/महाविद्यालयांना 'अ+' दर्जा देण्यात आला.

अंकुशराव टोपे कनिष्ठ महाविद्यालयाने नेहमीच शैक्षणिक उत्कृष्टता, शिस्त आणि प्रभावी व्यवस्थापन कौशल्य यावर भर दिला आहे. महाविद्यालयाने या मूल्यांकनासाठी आवश्यक असलेले सर्व निकष पूर्ण करत जालना जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. ही कामगिरी केवळ संस्थेसाठीच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरली आहे.

हे नेत्रदीपक यश मिळवण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे यांच्या नेतृत्वाखाली आणि समन्वयक रामप्रसाद भालेकर यांच्या नियंत्रणाखाली सर्व मानक प्रमुख, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले.

या ऐतिहासिक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे आणि सचिव सौ. मनीषाताई टोपे यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसेच प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, राहुल भालेकर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, डॉ. सीमा निकाळजे, डॉ. रामदास वैद्य, डॉ. कार्तिक गावंडे यांच्यासह ग्रंथालय प्रमुख डॉ. तुकाराम गजर आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी सर्व टीमचे अभिनंदन केले आहे.

# संक्षिप्त

## जिल्हाधिकारी कार्यालयात संत गाडगे बाबा महाराज यांना अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** थोर समाजसुधारक संत गाडगे बाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी संत गाडगे बाबा महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार सतीश तायडे, संपदा कुलकर्णी, दीपाली राऊत, सविता भोकरे,सविता पेरके, सविता मगरे, वैशाली डिघोळे, विठ्ठल बोरकर, अतुल केदार, सुनिल काळूंके, अनिल हिवाळे, इंद्रजित नानोटे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचाऱ्यांनी यावेळी संत गाडगे बाबा महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

## मोफत तांत्रिक उद्योजकता प्रशिक्षणाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने वेब डिझायनिग वर आधारित एक महिना व १. सायबर सिक्युरिटी ण्ड डेटाबेस रिकव्हरी वर आधारित, निमेशन ण्ड ग्राफिक्सवर आधारित दोन महिने कालावधीचे अनिवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश हा की अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक व युवतींनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वतःचा स्वयंरोजगार सुरू करावा किंवा या तांत्रिक माहितीच्या आधारे रोजगार मिळवावा. तरी इच्छुक व्यक्तींनी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र जालना येथे सुरेखा मोरे कार्यक्रम आयोजक, मो.९६९९३३४६४८ यांच्याशी संपर्क साधावा किंवा एमसीईडीच्या संकेतस्थळावर www.mced.co.in/Barti या लिंकवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी.प्रशिक्षणात संबंधित विषयाचे प्रॅक्टिकलसह तांत्रिक ज्ञान तसेच उद्योजकीय ज्ञान जसे उद्योग उभारणी कशी करावी, शासकीय कर्जविषयक, अनुदान योजनांची माहिती, प्रकल्प अहवाल, विक्री कला, उद्योग व्यवस्थापन, उद्योगांना भेटी, कर कायदा लायसन याविषयीची माहिती इत्यादी बाबींविषयी तज्ञ मार्गदर्शकाद्वारे प्रशिक्षण दिल्या जाईल.या प्रशिक्षणासाठी लाभार्थीची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे केली जाणार आहे. प्रशिक्षणासाठी लाभार्थी हा १८ ते ४५ वयोगटातील असावा, तो अनुसूचित जाती प्रवर्गातील असावा, किमान दहावी शिक्षण घेतलेले असावे, तो गेल्या पंधरा वर्षापासून महाराष्ट्राचा रहिवासी असावा तसेच स्वतःचा स्वयंरोजगार, रोजगार करण्याची तयारी असावी. प्रवेश अर्जासोबत आधार कार्ड, फोटो, स्वतःचा जातीचा दाखला, अंतिम सत्र गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, रहिवासी दाखला जोडणे आवश्यक आहे. असेही महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## पाणीपट्टी थकविणाऱ्या ग्रामपंचायतींना आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना पाटबंधारे विभागांतर्गत विविध प्रकल्पांतून अनेक ग्रामपंचायतींना पिण्याच्या पाण्यासाठी पाणीपुरवठा केला जातो. मात्र या योजनांकडून पाणीपट्टी भरण्याबाबत सातत्याने टाळाटाळ केली जात असल्याचे समोर आले आहे. सध्या विभागाची ४ कोटी ८५ लाख ६३ हजार रुपयांची थकबाकी आहे. तरी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत योजनाधारकांनी सात दिवसांची अंतिम मुदतीत आपली थकबाकी जमा करावी, असे कार्यकारी अभियंता एस. बी. कोरके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ मधील भाग ६, कलम ४९ (ज) नुसार कारवाई केली जाणार आहे. यामध्ये केवळ पाणीपुरवठाच नव्हे, तर संबंधित योजनेचा विद्युत पुरवठाही खंडित करण्यात येणार असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

## ५० बचतगटांना मिनी ट्रॅक्टर वाटपासाठी आज निघणार लॉटरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नोंदणीकृत स्वयंसहायता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर वाटप करण्याच्या योजनेची जिल्हास्तरीय सोडत (लॉटरी) मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर होणार आहे. जालना जिल्ह्यासाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता ५० मिनी ट्रॅक्टरचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून पात्र बचतगटांमधून लॉटरी पद्धतीने लाभार्थी निवडले जाणार आहेत. तरी पात्र ठरलेल्या बचतगटांमधील अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव यांनी या निवड प्रक्रियेसाठी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त राजू एडके यांनी केले आहे. समाज कल्याण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या या योजनेंतर्गत ९ ते १८ अश्वशक्तीचे मिनी ट्रॅक्टर आणि त्याची उपसाधने तब्बल ९० टक्के अनुदानावर पुरविली जातात. या सुवर्णसंधीसाठी जिल्ह्यातील अनेक बचतगटांनी अर्ज केले होते. अर्जांची छाननी केल्यानंतर पात्र आणि अपात्र ठरलेल्या बचतगटांची अंतिम यादी समाज कल्याण कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सांस्कृतिक सभागृहात दुपारी ३ वाजता ही सोडत प्रक्रिया पार पडणार आहे. निवडीमध्ये पारदर्शकता राहावी यासाठी लॉटरी पद्धतीचा अवलंब केला जात आहे. असेही कळविले आहे.

## विकसित भारतासाठी सर्वांगीण विकास हीच काळाची गरज: डॉ. दीपक बुक्तर

**आत्ताच एक्सप्रेस/जालना (प्रतिनिधी)** पुढील काळात भारताला महासत्ता म्हणून पाहायचे असेल, तर केवळ आर्थिक प्रगती पुरेशी नाही. जोपर्यंत देशातील सामाजिक, सांस्कृतिक, रोजगार आणि मूलभूत पायाभूत सुविधांचा विकास तळागाळापर्यंत पोहोचत नाही, तोपर्यंत 'विकसित भारत' ही संकल्पना खऱ्या अर्थाने यशस्वी होणार नाही, असे प्रतिपादन जालना समाजकार्य महाविद्यालयाचे प्रा. डॉ. दीपक बुक्तरे यांनी केले.रामनगर येथे आयोजित जालना समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विशेष शिबिरामध्ये 'प्रमुख मार्गदर्शक' म्हणून ते बोलत होते.डॉ. बुक्तरे यांनी आपल्या मार्गदर्शनात स्पष्ट केले की, जेव्हा भारतीय स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होतील (२०४७), तेव्हा भारत जगातील एक प्रमुख विकसित देश असेल. मात्र, हा टप्पा गाठण्यासाठी आपल्याला आर्थिक विषमतेवर मात करून सर्वसमावेशक विकासावर भर द्यावा लागेल.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रवीण कनकुटे यांनी विकासाच्या व्याख्येवर परखड भाष्य केले. ते म्हणाले की,विकसित भारत हे केवळ एक स्वप्न नसून ती एक मोठी जबाबदारी आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813